https://snapfrom.com/ https://instagramvideodownloader.net/ https://instadl.app/

संक्षिप्त

बीएनआयने ५०,०००+ सदस्यांसह भारतात माइलस्टोन केला साजरा

मुलुंड : बिझनेस नेटवर्क इंटरनॅशनल (बीएनआय) या जगातील सर्वात मोठ्या रेफरल मार्केटिंग संस्थेने भारतातील ५० हजार सदस्यांची संख्या ओलांडली आहे. मुंबईत, बीएनआयचे ४६९१ सदस्य आहेत, ज्यांनी गेल्या एका वर्षात २४४९ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा देशभरातील टियर ३ आणि ४ शहरांमधील लहान व्यवसायांना सक्षम करण्यासाठीच्या ग्राउंडब्रेकिंग उपक्रमासोबत आला आहे. जागतिक महामारीमुळे उद्भवलेल्या आव्हानांना न जुमानता, बीएनआयने भारतातील असाधारण वाढ सुरूच ठेवली आहे. १२१ शहरांमधील १०८० अध्यायांमध्ये ५०८३० सदस्यांसह, बीएनआयने देशात आपले अस्तित्व दृढपणे प्रस्थापित केले आहे.

म्हाडा सोडत अर्ज प्रक्रियेची माहिती देण्यासाठी लाईव्ह वेबिनार

मुंबई : म्हाडाच्या ऑनलाईन सोडतीसाठी अर्जदारांना सुलभतेने अर्ज सादर करता यावा, याकरिता म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे आज १७ जून रोजी सकाळी ११ वाजता लाईव्ह वेबिनार आयोजित करण्यात आले आहे. मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील ४०८२ सदनिकांच्या विक्रीसाठी २२ मे २०२३ पासून म्हाडाचे संकेतस्थळ व मोबाइल अॅपद्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. म्हाडाच्या सोडतीसाठी ज्या अर्जदारांनी नोंदणी केली आहे, त्यांनी lottery-webinar.mhada.gov.in या लिंकचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच https://mhada.gov.in या संकेतस्थळावरही वेबिनारची लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

मुंबईत कोरोनाच्या ६ नव्या रुग्णांची नोंद

मुंबई : मुंबईत शुक्रवारी कोरोनाच्या ६ नव्या रुग्णांची नोंद झाली तर ५ जण बरे होऊन घरी परतले. सध्या सक्रिय रुग्णांची संख्या ४४ असून २४ तासात अवघ्या ७५५ चाचण्या झाल्या, तर हॉस्पिटलमध्ये ३ रुग्णांना दाखल करावे लागले.

सोडतीतील ५८५४ पात्र गिरणी कामगार अजूनही घराच्या प्रतीक्षेत

एमएमआरडीएच्या वसईतील ४५ हजार घरांची म्हाडाला अपेक्षा

मुंबई : जयंत होवाळ

- **२०१२ साली १८ गिरण्यांमधील ६९२५ सदनिकांसाठी सोडत काढण्यात आली होती. त्यातील ६६९१ सदनिकांचे वितरण झाले आहे. मात्र कुर्ला व शिवडी येथील स्वान मिल मधील सदनिकांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने येथील २३४ सदनिकांचा ताबा देण्यात आलेला नाही.**

गिरणी कामगारांना घरे मिळावीत म्हणून २०१२ पासून २०२० पर्यंत काढण्यात आलेल्या सोडतीतील जवळपास ५८५४ पात्र कामगारांना अजूनही घराची प्रतिक्षा आहे. एकूण दीड लाख कामगारांनी घरासाठी अर्ज केले आहेत.

वसई येथे एमएमआरडीए ४५ हजार घरे बांधत असून ही घरे कामगारांसाठी मिळाली तर काही प्रमाणात 'बॅकलॉग' भरून निघेल. मात्र किती कामगार वसईला जाण्यास राजी होतील याविषयी साशंकता आहे.

२०२० साली मुंबईतील बॉम्बे डाईंग, बॉम्बे डाईंग टेक्स्टाइल मिल आणि श्रीनिवास मिलमधील ३८९४ कामगारांसाठी सोडत काढण्यात आली होती. या सोडतीतील यशस्वी कामगार-वारसदार यांच्यापैकी १४१२ जणांना सदनिकेच्या विक्री किमतीचा भरणा करण्यासाठी तात्पुरते देकार पत्र देण्यात आले असून उर्वरित २४८२ कामगार किंवा त्यांच्या वारसांची पात्रता निश्चित करण्याचे काम सुरू आहे. हे किचकट काम पुढील तीन महिन्यात मार्गी लावण्याचे मोठे आव्हान म्हाडापुढे आहे. पात्रता निश्चित करून कामगारांना घराचा ताबा लवकर मिळावा यासाठी आमदार सुनील राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीने १६२ कामगारांना चाव्या देण्याचे काम मार्गी लावले आहे.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या ११ मिलमध्ये १२५ एकर जागा उपलब्ध आहे. या जागेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार महामंडळाने राज्य सरकारला दिल्याचे समजते. हे अधिकार मिळाले तर १२५ एकर जागा मिळेल. येथील चाळीतील कामगारांना ४०५ चौरस फुटांची घरे मिळू शकतील.

ससून डॉक परिसरातील अस्वच्छतेची संयुक्त पाहणी करा

हायकोर्टाचे महापालिका, प्रदूषण मंडळ, बंदर प्राधिकरणाला आदेश

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

ससून डॉक परिसरातील घाणीचे साम्राज्य आणि त्या परिसरातील रहिवासी व कामगारांच्या आरोग्याच्या प्रश्नावर प्रकाशझोत टाकणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुंबई बंदर प्राधिकरणाला या परिसराची संयुक्त पाहणी करून प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देत याचिकेची सुनावणी २ जुलैला निश्चित केली.

मुंबईतील सर्वात जुन्या गोदींपैकी एक असलेले ससून डॉक १९७५ मध्ये बांधण्यात आले. शहरातील हे पहिले वेट डॉक म्हणून ओळखले जाते. या ससून डॉक परिसरात मासळी विक्रेत्यांमुळे अस्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मासळी बाजार, घनकचऱ्याची विल्हेवाट, सांडपाणी तसेच माशांच्या कचऱ्याच्या वाहतुकीशी संबंधित कायद्यांची अंमलबजावणी करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे, असा आरोप करीत कुलाब्यातील रहिवासी रेणू कपूर, घनश्याम हेगड तृप्ती नरुला, आणि अतुल झवेरी यांनी उच्च न्यायलयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर प्राथमिक सुनावणी झाली.

चार्जिंगसाठी उभ्या असलेल्या बेस्ट बसला आग

मालाड : पुढारी वार्ताहर

मालवणीतील बेस्ट आगारात चार्जिंग स्टेशनवर चार्जिंगसाठी उभ्या असलेल्या टाटा मोटर्स (हंसा)च्या वातानुकूलीत बेस्ट बसला दुपारी २.३० च्या सुमारास अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. मात्र आगारात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी आग विझवल्यामुळे शेजारी उभ्या असलेल्या इतर बसेसला वाचवण्यात यश आले. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अग्निशमन दलाची गाडीही घटनास्थळी दाखल झाली होती. बेस्ट प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दल या आगीच्या घटनेची सखोल चौकशी करत आहेत.

NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार आणि सहभागी राज्य सरकारे यांची संयुक्त क्षेत्र कंपनी)

निविदा आमंत्रण सूचना

एन.एच.एस.आर.सी.एल. ''मुंबई-अहमदाबाद अति जलद रेल्वे प्रकल्पा निगडित अंजुर गाव, भिवंडी तालुका, जिल्हा ठाणे येथील सध्याचा गाव रस्त्याचे पर्यायी सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधणे, ठाणे डेपो (डी-१) करीता'' निविदा मागवत आहेत. (निविदा सूचना क्र. एन. एच. एस. आर. सी. एल. / एम. ए. / सी. पी. एम. / एम. यु. एम. /डब्ल्यू. आर. के. /२३-२४/०४). निविदा संकेतस्थळ **https://etenders.gov.in/eprocure/app** वरून १६.०६.२०२३ रोजी दु. १२.०० वाजल्यापासून ते ०७.०८.२०२३ रोजी सायं. १८.०० वाजेपर्यंत डाऊनलोड करून घेता येतील. बोली सादर करण्याचा अंतिम दिनांक ०७.०८.२०२३ रोजी सायं. १८.०० वाजेपर्यंत आहे.

मुख्य प्रकल्प व्यवस्थापक/मुंबई

देशात हवाई वाहतुकीत छत्तीस टक्क्यांनी वाढ

देशांतर्गत हवाई वाहतुकीत यंदाच्या जानेवारी ते मे दरम्यान तब्बल ३६ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. या कालावधीत ६३६.०७ लाख प्रवाशांनी हवाई सफर केली. गेल्या वर्षी याच कालावधीत ही संख्या ४६७.३७ लाख होती. यंदा एकट्या मेमध्ये १३२.१४ लाख प्रवाशांनी हवाई सफर केली.



इझी मनीच्या मोहापायी गमावले १.२७ कोटी रु.

मुंबई : सायबर भामटे गोड बोलून कसा केसाने गळा कापतात, त्याचे मासलेवाईक उदाहरण नव्याने समोर आले आहे. नवा प्रकार आहे मुंबईतील. एका व्यक्तीने आपला फ्लॅट १.२७ कोटींना विकला. नंतर तो ही रक्कम भरभक्कम परताव्याच्या हेतूने गुंतवणार होता. त्याचवेळी त्याला सायबर चोरट्यांनी हेरले. पलीकडून त्याला एका महिलेचा आवाज आला व तिने त्याला अर्धवेळ नोकरीतून बक्कळ कमाईचे आमिष दाखविले. विविध हॉटेल्सना मानांकन देणे असे या नोकरीचे स्वरूप असल्याचे त्याला सांगण्यात आले. त्यानुसार त्याने काम सुरू केले आणि सुरुवातीला त्याच्या खात्यात १० हजार रुपये जमा झाले. नंतर एका फटक्यात त्याला एकूण ६० लाख रुपयांचा नफा बँक खात्यावर दिसून आला. आता आणखी पैसे कमावण्यापासून तो स्वतःला रोखू शकला नाही. त्याची ही कमजोरी हेरून त्याला एक लिंक पाठवण्यात आली. ही लिंक त्याने क्लिक केली आणि त्याचे बँक खाते क्षणार्धात साफ झाले. लगेच त्याने पोलिसांत तक्रार दिली. सायबर चोरट्यांनी डल्ला मारलेली खाती पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेशातील असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी ही सगळी खाती गोठवली आहेत.

PUBLIC NOTICE

We the undersigned **SHRI. NIREN NARENDRA PATRAWALA** and **MRS. MANALI NIREN PATRAWALA** are planning to purchase an ownership flat from **SHRI. KANTILAL HASTIMAL JAIN,** who is the sole owner of Flat No.403, 4th Floor, D-Wing, Falcon Castle 'D' Co-operative Housing Society Ltd., Senapati Bapat Marg, Elphinstone (W), Mumbai-400 013, admeasuring about 343 Sq. Ft. Carpet Area, bearing C.S.No.833 of Lower Parel Division within the jurisdiction of "G/South" Ward of Brihanmumbai Municipal Corporation. If any person/authority/financial institution/bank has any objection for sale of abovementioned flat then please inform to undersigned within 7 days of this Public Notice at following address. None of the objection will be entertained after notice period.

Place - Mumbai
Date:- 17/06/2023.

Sd/- Sd/-
(SHRI. NIREN NARENDRA PATRAWALA) (MRS. MANALI NIREN PATRAWALA)
Flat No. 101, 1st Floor, D-Wing, Falcon Castle 'D' Co-operative Housing Society Ltd., Senapati Bapat Marg, Elphinstone (W), Mumbai- 400 013
Mob. No. 7021980227 Email id:- patrawalaniren@hotmail.com

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड (एमआरव्हीसी लि.)

निविदा करीता अनुरोध (आरएफटी)
राष्ट्रीय खुली प्रतिस्पर्धात्मक निविदा (एनओसीटी)
ऋण सं.: एल0228ए
आरएफटी सं. : एमआरवीसी/डब्ल्यू/111

एमआरवीसी लिमिटेड ज्याचे कार्पोरेट कार्यालय, दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन भवन, मुंबई-400 020 मध्ये स्थित आहे, द्वारे **''एमयुटीपी-।।।च्या अंतर्गत पनवेल-कर्जत दुहेरी लाईन उपनगरीय कॉरिडोर परियोजनाच्या संबंधामध्ये पनवेल-कर्जत अनुभाग मध्ये पी-वे/ट्रॅक जोडण्याच्या कार्याच्या सोबत पी-वे सामुग्री (रेल्वे आणि पीएससी मेन लाईन आणि स्पेशल स्लीपर सोडून) ची पूर्तता तथा बलास्टची(खडी) पूर्तता, यार्ड रिमॉडलिंग, टर्नआउट, एसईजे टाकणे तथा विविध कार्यांचे निष्पादन''** कार्याकरीता एकल चरण-दोन पॅकेट प्रणालीच्या अंतर्गत ई-निविदा आमंत्रित केली जात आहे. कार्यपूर्णता अवधि : **24 महिने.** निविदा सुरक्षा : **रू. 34,30,000.00,** निविदा दस्तावेजाची किंमत : **शुन्य,** निविदा-पूर्व बोली बैठक **दिनांक 27/06/2023 ला 11.00 वाजता (भामास)** आयोजीत केली जाईल. निविदा दिनांक **03.08. 2023 ला 13.00 वाजता** किंवा त्याच्या पहिले वेबसाईट : **https://eprocure.gov.in** वर आनलाईन जमा केली गेली पाहिजे तथा तांत्रीक निविदा त्याच दिवशी 15.30 वाजता (भामास) उघडली जाईल. शुद्धिपत्र, जर कुठले असेल तर फक्त वेबसाईट वर जारी केले जातील. विवरण एमआरवीसी ची वेबसाईट म्हणजे **www.mrvc.indianrailways.gov.in** वर उपलब्ध आहे. पुढील विवरणा करीता उपरोक्त वेबसाईट वर उपलब्ध विस्तृत निर्दिष्ट प्रोक्युरमेंट सूचना पहावी. सीपीएम-I, मुम्बई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड. पत्ता : दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन भवन, एम.के रोड, मुंबई-400 020 दूरध्वनी : 022-22618456, ई-मेल : cpm1@mrvc.gov.in, वेबसाईट : www.mrvc.indiarailways.gov.in, आणि https://eprocure.gov.in

---

मध्य रेल्वे
बोगीजचे पीओएच
निविदा सूचना क्र. :
RR/PR/WC/1768/2023-24/25
Date : 15.06.2023

कामाचे वर्णन : एनएमजी, एनएमजीएचएस (कन्व्ह.) व ओसीव्हीज् बोगीज्चे पीओएच. **परिमाण :** २४० कोच सेट (अर्थात ४८० बोगीज्), **निविदा बंद होणे/उघडण्याची तारीख व वेळ :** दि. १३.०७.२०२३ रोजी दु. १२.०० वा. निविदा तपशील व निविदा दस्तावेज वेबसाइट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. निविदा वेबसाइटच्या माध्यमातून ई-टेंडरिंग प्रारूपातून केवळ स्वीकारण्यात येतील.

उपमुख्य यांत्रिकी
अभियंता (३)

तिकिटांकरिता यूटीएस ॲप डाऊनलोड करा. 226

सायटिका
गुडघेदुखी
टाचदुखी

जॉईंट ॲण्ड स्पाईन क्लिनिक
विना ऑपरेशन विना साईड इफेक्ट

सायटिका, कंबरेच्या मणक्यातील गॅप, मणक्यांची चकती किंवा गादी सरकणे, गुडघ्यातील गादी तुटणे, गुडघ्यातील स्नायुना ईजा मानदुखी, चकरा येणे, डोके दुखी, मायग्रेन, हाताची ताकत कमी होणे, बोटामध्ये मुंग्या येणे, बधीर होणे, बोट अटकणे, टाचदुखी, हाड वाढणे, तळपायाची जळजळ होणे, फ्रोझन शोल्डर, **AVN HIP JOINT** (खुब्याचे सांधे खराब होणे), सांधेवात रुमॅटॉईड आर्थोयटीस **ankylosing spondylitis** पॅरॅलिसिस, हातापायात मुंग्या येणे जडपणा व बधीर वाटणे, क्रॅम्पस येणे, प्रसुतीनंतरची कंबर दुखणे, मणक्याचे फ्रॅक्चर ऑस्टीओपोरोसीस मुळे मणका दबुन जाणे, डायबेटीक न्युरोपॅथी इत्यादीसाठी.

मुंबई - (फक्त दोन सोमवार अल्टरनेट) सकाळी ९ ते ३
५०३, कोहिनुर स्पेशालिटी क्लिनीक, पाचवा मजला, सेंट्रल टॉवर, कोहिनुर स्क्वेअर, शिवसेना भवन समोर, दादर (वेस्ट)

9370155293 / 9422713387
तपासणी फीस 500/-
इंजेक्शन खर्च (4500/-) एका डोसचे

MAHA HOUSING
CORPORATION

Maharashtra Housing Development Corporation Limited

Unit No.32, 3rd Floor, Sakhar Bhavan, Ramnath Goenka Marg,
Nariman Point, Mumbai 400 021 **Tel.:** 022-4044 1000;
Website: https://mahahousing.mahaonline.gov.in

E-TENDER NOTICE

Name of work: "Empanelment of Marketing Agencies for branding, marketing, sales & post-sale services for residential and commercial units of Affordable Housing projects developed under the PMAY-U scheme located in various cities of Maharashtra."

Tender Title	Empanelment of Marketing Agencies for branding, marketing, sales & post-sale services for residential and commercial units of Affordable Housing projects developed under the PMAY-U scheme located in various cities of Maharashtra
Tender Notice Number	06/2023-24 dated 16.06.2023
Tender Type	Expression of Interest (EOI)
Department	Marketing
Publish Date	16-06-2023
Document Download Start Date & Time	16-06-2023 02:00 PM
Clarification Start Date & Time	16-06-2023 02:10 PM
Clarification End Date & Time	22-06-2023 01:00 PM
Pre-bid meeting Date	23-06-2023 02:00 PM
EOI submission End Date & Time	10-07-2023 03:00 PM
EOI Opening Date & Time	11-07-2023 04:00 PM
Cost of EOI Document (INR)	Rs. 5,900/- (To be paid online)
Earnest Money Deposit (EMD)	Rs. 5,00,000/- (To be paid online)
Website	https://mahatenders.gov.in
Office/ Contact Person/ email for clarifications	mhdc.mahahousing@maharashtra.gov.in Assistant Marketing Officer 022-40441000
Bid Validity	180 days

Note:

Kindly see all clarifications/corrigendum on mahatenders.gov.in and MahaHousing website & read Bid Document carefully before submission & ensure that all documents are fully authenticated by the Authorized Signatory with his Digital Signature.

Sd/-
Ajit Kawade
Managing Director & CEO
Maharashtra Housing Development Corporation Ltd.

खड्डे बुजवण्यावरून कंत्राटदार-पालिका प्रशासनामध्ये वाद

मुंबई : रस्त्यावरील खड्डे कोणी बुजवायचे यावरून कंत्राटदार व महापालिका प्रशासनामध्ये वाद सुरू आहे. नवीन रस्त्याचे कंत्राट दिलेल्या कंत्राटदाराला निविदेतील अटी शर्तीनुसार स्वतःच खड्डे बुजवणे बंधनकारक आहे. पण कंत्राटदार खड्डे बुजविण्यास तयार नसल्याचे समजते. त्यामुळे पालिकेने स्वतंत्र कंत्राटदाराची नियुक्ती करून खड्डे बुजवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी येणारा खर्च नवीन रस्ते बनवणाऱ्या कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येणार आहे.

लोकलमध्ये सीसीटीव्ही, टॉकबॅक यंत्रणा कधी ?

मुंबई : धावत्या लोकलमध्ये महिलांवर अनेकदा चोरीच्या उद्देशाने हल्ले होतात तसेच विनयभंगाच्या घटना देखील घडतात. त्यामुळे मध्य आणि पश्चिम रेल्वे प्रशासनाने काही वर्षापूर्वी महिलांच्या डब्यात सीसीटीव्ही कॅमेरे आणि टॉक बॅक यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतला. परंतु याची अंमलबजावणी मात्र धिम्या गतीने सुरू आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे लोकलमधील गुन्ह्याचा उलगडा होण्यास मदत मिळते. तसेच डब्यातील टॉक बॅक यंत्रणेद्वारे महिला प्रवासी गार्ड किंवा मोटरमनशी संवाद साधून तात्काळ मदत मागता येते. या दोन्ही प्रकल्पांसाठी पश्चिम रेल्वेला १२३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

जाहीर सुचना

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका कं. १०६, पहिला मजला, गिता भवन को. ऑप. हौ. सो. लि., आनंद नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि पालघर, ४०१२०२, या मिळकतीशी संबंधीत खालील मुळ दस्तऐवज हरवले आहेत. (१) **मे. रुचिता कन्स्ट्रक्शन कं.** व **श्रीमती लिलावंती ललीतचंद उडानी** यांच्यातील दिनांक ३ मार्च १९८२ रोजीचा मुळ करारनामा. सदर दस्तऐवजांची मूळ प्रत कोणासही सापडल्यास आमच्या खालील पत्त्यावर ताबडतोब सुपूर्द करावे. सदर सदनिकेच्या सध्याच्या सहमालक श्रीमती लिलावंतीबेन लक्ष्मीदास जटानिया या दिनांक ०३/०४/१९९३ रोजी मयत झाल्या आहेत व त्यांच्या मृत्यूपश्चात सदर सदनिका त्यांचा वारस मुलगा व सदर सदनिकेचे सहमालक **प्रदीपकुमार लक्ष्मीदास जटानीया** यांच्या नावे सदर सोसायटीने हस्तांतरीत करावयाचे ठरविले आहे. जर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधी वा त्याच्या हस्तांतराबाबत कोणताही हक्क, दावा आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येईल

श्री. पराग ज. पिंपळे
वकील, मुंबई उच्च न्यायालय,
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर.
मो.९८९००७९३५२ दिनांक:१७.०६.२०२३

PUBLIC NOTICE

I the undersigned **SHRI. KANTILAL HASTIMAL JAIN** planning to purchase an ownership flat from **SHRI. RUPEN NARENDRA PATRAWALA** and **SHRI. NIREN NARENDRA PATRAWALA,** both are joint owners of Flat No.101, 1st Floor, D-Wing, Falcon Castle 'D' Co-operative Housing Society Ltd., Senapati Bapat Marg, Elphinstone (W), Mumbai- 400 013, admeasuring about 634 Sq. Ft. Carpet Area, bearing C.S.No.833 of Lower Parel Division within the jurisdiction of "G/South" Ward of Brihanmumbai Municipal Corporation. If any person /authority/financial institution/bank has any objection for sale of abovementioned flat then please inform to undersigned within 7 days of this Public Notice at following address. None of the objection will be entertained after notice period.

Place - Mumbai
Date :- 17/06/2023.

SD/-
SHRI. KANTILAL HASTIMAL JAIN
Flat No.403, 4th Floor, D-Wing,
Falcon Castle 'D' Co-operative Housing Society Ltd., Senapati Bapat Marg,
Elphinstone (W), Mumbai-400 013
Mob. No. 8600631685
Email id:- kailash.jain64@yahoo.com

जाहीर नोटीस

सूचना यादवारे आम जनतेस देण्यात येत आहे की माझे अशील मे ऐमिस्को ॲग्रो केम लिमिटेड,पत्ता-अखंड ज्योति, ८वा रस्ता, सांताक्रुझ, पूर्व, मुंबई ४०० ०५५; हे सदनिका क्रमांक ३, पहिला मजला, विभूती अपार्टमेंट को ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, सी. टी.एस. नं.१५६, शांती रोड,रुईया पार्क,जुहू,मुंबई ४०० ०४९ चे मालक आहेत. सदर सदनिका मे. ऐमिस्को ॲग्रो केम लिमिटेड यांनी विक्री कराराने दिनांक २०.०३.२००२ अन्वये ऐम्को पेस्टीसाइड्स लि.,यांचे कडून विकत घेतली आहे (COS/A/AY/NEW/3916/2019 dated 07.01.2021).ऐम्को पेस्टीसाइड्स लि. यांनी खरेदीखत क्र. बबज ८७७७/९९,दि. ०७.१२.१९९९ अन्वये विभूती इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. कडून खरेदी केलेली होती. सदर साखळी करारनामे/ मूळ कागदपत्रे कार्यालयाचे स्थलांतर करताना गहाळ झाले. याबाबत वाकोला पोलिस स्टेशन सांताक्रूझ,येथे मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याची नोंद पोलिस अहवाल क्र.४८६७४-२०२३ दिनांक १२.०६.२०२३ रोजी दाखल केलेली आहे. याबाबत कोणाही व्यक्तीची काही हरकत/दावा असल्यास,तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत लेखी पुराव्यानिशी खालील पत्त्यावर कळवावे, तदनंतर कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई
दिनांक :- १६ जून २०२३

सही/-
ॲड. राजेशकुमार एल.यादव,
अे-१३,पहिला मजला,श्री धारा धाम को.ऑप. हौ.सो.,९० फिट रोड, साकीनाका,अंधेरी (पूर्व) मुंबई-४०० ०७२

---

modus ED-SWT

इंद्रीयाकडील रक्त पुरवठा वाढवणारी अत्याधुनिक
शॉक व्हेव्ह थेरेपी

अत्याधुनिक झेड.एस.आर.स्टेपलर सुंता शस्त्रक्रिया
इंद्रीयाची त्वचा मागे होत नसल्यास व मधुमेहामुळे नेहमी होणारे लैंगिक इन्फेक्शनसाठी आजच शस्त्रक्रिया करून घ्या.
खर्च ~~४५,०००~~/- फक्त २००००/-

• मधुमेह • लठ्ठपणा • रक्तदाब व वयानुसार आलेली लैंगिक शिथिलतेसाठी
शॉक व्हेव्ह व हार्मोनल थेरेपी

शीघ्र विर्यपतनासाठी
युरोलॉजीकल पेनाईल नर्व्ह ब्लॉक व पेनाईल न्युरेक्टॉमी उपचार

पुरुष वंधत्वासाठी अत्याधुनिक उपचार
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
ॲझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण सेक्स क्लिनिक

शाखा क्र. १ : जिलानी मंझिल, पोर्तुगीज चर्चच्या समोर, दादर वेस्ट (W), मुंबई
शाखा क्र. २ : पहिला मजला, पुरणपोळी घराच्या बाजुला, आरबीएल बँकेच्यापुढे, नाऊपाडा, ठाणे (W)

YouTube १ लाख ६० हजार सबस्क्राईबर २८ मिलीयन पेक्षा लोकांनी पाहिलेत **9619414903**

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क,
प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी
कोलकाता 700 091, जिल्हा 24-परगणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: ठाणे

L&T Finance

गहाण मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मत्तांची पुनर्बांधणी आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत पुढील मालमत्तेचा **'जिथे आहे तिथे तत्त्वावर'** आणि **'जे आहे ते'** परिस्थितीत **'जाहीर ई-लिलावाच्या'** माध्यमातून देय रकमा आणि त्यांवरील व्याज, शुल्के आणि खर्च इ. वसुल करण्यासाठी ई-लिलाव करत आहे.

कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 14.06.2023 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1.अमित नाईक 2. आत्माराम नाईक	मालमत्तेचा पत्ता - फ्लॅट क्र. 104, इमारत बी, अधिमापन चटई क्षेत्रफळ 51.66 चौ.मी. पहिला मजला, इमारत एन जी डायमंड हिल फेज - 1, जुना सर्वेक्षण क्र. 442/6 (भाग) आणि 443/2 (भाग) नवा सर्वेक्षण क्र. 115/6ए, 127/2बी, गाव - नवघर, महापौर बंगल्यासमोर, बेवेरी पार्क, मिरा रोड पूर्व ठाणे महाराष्ट्र - 401107 सीमारेषा: पूर्व - मोकळा भूखंड; पश्चिम - मारी गोल्ड मार्ग; उत्तर - मोकळा भूखंड; दक्षिण - गौरव रेसिडन्सी	H18398100 120040104, H18398100 120040104 L	31 मे 2023	रु. 6,28,312/-	रु. 71,37,260.66/-	रु. 62,83,120/-	12-07-2023	19-07-2023

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. जाहीर ई-लिलाव उपरोक्त दिनांक व वेळेरोजी पार पाडण्यात येईल, व सदर वेळी उपरोक्त प्रतिभूत मत्तांची **'जिथे आहे तिथे'** तत्त्वावर आणि **'जे आहे ते'** तत्त्वावर विक्री केली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **17/07/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **19/07/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **20/07/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात **ज्याचे नाव : प्रथमेश लोके, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी, कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 17.06.2023
ठिकाण: ठाणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

https://instadownload.app/ For More ePaper: https://www.fresherwave.com/ https://instadownload.app/